# किडनाशके उर्वरित अंश तपासणी प्रयोगशाळा

कृषिमाल उत्पादन, विक्री व साठवणुक करतांना विविध रोग व किडींचा प्रादुर्भाव होतो. त्यावर नियंत्रणासाठी वेगवेगळया कीडनाशकांचा वापर करावा लागतो. अतिसावधानतेमुळे व अज्ञानामुळे कीडनाशकांचा जादा व अनावश्यक वापर होतो व त्यामुळे कृषि मालाची काढणी झाल्यानंतर त्यात कीडनाशक रसायनाचा अंश ब-याच प्रमाणांत आढळून येतो. ठराविक मर्यादिच्या बाहेर किंवा जादा प्रमाणांत अंश असल्यास तो मानवी जीवनाला घातक ठरु शकतो.

कृषिमालाची निवड करतांना रंग, चव, आकार, पौष्टीकता सारख्या गुणधर्मा बरोबरच कीडनाशक उर्वरीत अंशाच्या पातळीस अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतीक आरोग्य संघटना आणि अन्न व कृषि संघटना यांच्या संयुक्त आयोगाने अशा कीडनाशक अंशाची क्षम्य मर्यादा ठरविली आहे.

जागतिक व्यापार संघटना व त्यातील विविध करारामुळे कृषिमालास आंतरराष्ट्रीय बाजारपेठा खुल्या झाल्या आहेत. आयात करणारे राष्ट्र कृषि मालात कीडनाशक उर्वरीत अंशाचे प्रमाण व त्याची मर्यादा याची बारकाईने पाहणी करीत आहेत. त्यामुळे निर्यातक्षम मालात असे अंश कमीत कमी कसे राहतील यासाठी शेतकरी, व्यापारी व निर्यातदार प्रयत्नशील आहेत. निर्यातक्षम मालांत अशी तपासणी करणे चालू आहे. केवळ निर्यातक्षम मालातच उर्वरीत अंश मर्यादीत ठेवण्यासाठी तपासणी करणे योग्य होणार नाही, तर घरगुती स्थानिक बाजारपेठेतील कृषि मालात उर्वरीत अंश तपासणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

गुणनियंत्रण निरीक्षकाकडून शेतातून काढणी योग्य विक्रीपुर्व मालातून बाजारपेठातील ठोक व किरकोळ विकेत्याकडून नमूने घेऊन त्याची कृषि विभागातील प्रयोगशाळेत तपासणी करता येते.

किडनाशके उर्वरीत अंश तपासणी प्रयोगशाळा, पुणे व नागपूर येथे कार्यान्वीत आहेत. सदर प्रयोगशाळांचा स्थापनेबाबतचा तपशील खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **किडनाशके उर्वरीत अंश प्रयोगशाळा** | **स्थापनेचे वर्ष** | **पत्ता व दुरध्वनी क्रमांक** | **एन.ए.बी.एल.** |
|---|---|---|---|---|
| 1 | किडनाशके उर्वरीत अंश प्रयोगशाळा, पुणे | 1973-74 | कृषि भवन, शिवाजीनगर, पुणे 411004, दुरध्वनी क्रमांक 020-25510300 | एन.ए.बी.एल. मानांकन प्राप्त |
| 2 | किडनाशके उर्वरीत अंश प्रयोगशाळा, नागपूर | 2000-01 | कृषि महाविद्यालय आवार, महाराज बाग, नागपुर, -440001, दुरध्वनी क्रमांक 0712-2559903 | एन.ए.बी.एल. मानांकन प्राप्त. |

वरील प्रयोगशाळेत फळे, भाजीपाला, मसाल्याची पीके, दुग्ध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी, मासे व मांस तसेच शितपेये व विविध कृषि उत्पादनातील कीटकनाशकांचे उर्वरीत अंश गुणवत्ता तपासण्यात येतात. सदर प्रयोगशाळेत शेतकरी, नागरीक अथवा सरकारी, निमसरकारी संस्था, सहकारी संस्था यांचेकडील नमुने तपासुन घेऊ शकतात.

किडनाशके उर्वरीत अंश तपासणी प्रयोगशाळा, पुणे व नागपूर यांना आय.एस.ओ.17025: 2005 एन.ए.बी.एल. मानांकन प्राप्त झाले आहे.

प्रयोगशाळेत मागील ३ वर्षात तपासणी केलेल्या नमून्यांची माहिती

| **वर्ष** | **क्षमता (संख्या)** | **प्राप्त (संख्या)** | **तपासणी (संख्या)** | **क्षम्य मर्यादेपेक्षा जास्त अंश आढळून आलेले नमुने (संख्या)** | **अप्रमाणित प्रमाण (%)** |
|---|---|---|---|---|---|
| २०१९-२० | १५०० | ८३६ | ८२१ | ० | ० |
| २०२०-२१ | १५०० | १६१२ | १५८६ | ११ | ०.६९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०२१-२२ | १५०० | ११८६ | ८९१ | ५६ | ६.२८ |